पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०९

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०२/०३/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **०२/०३/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२.मा.साधना अंकुश मळेकर
३.मा.अनुराधा गणपत गोरखे
४.मा.सुनिता हेमंत तापकीर
५.मा.सोनवणे शारदा हिरेन
६.मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
७.मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
८.मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या शिवाय मा.चारठाणकर – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, मा.रामगुडे- कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) ठरावामध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.शारदा सोनवणे , मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) झोपडपट्टीमध्ये राहणा-या कुटूंबाकरिता स्वच्छता किट पुरविणेबाबत - मा.अनुराधा गोरखे, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

-------------

अ) दिनांक १६/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.**०८**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०२/०३/२०२१ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/८०/२०२१ दि.२६/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेत मौजे किवळे येथील स.नं. ३९ पैकी सुमारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्र १।१२६ अन्वये टेलिकॉम सेंटर या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आलेले आहे. सदर आरक्षणासाठी संपादन संस्था दूरसंचार विभाग असून सदर विभागाने या जागेची त्यांना आवश्यकता नसल्याचे महापालिकेस कळविलेले आहे. सदर जागेच्या आरक्षणाचे प्रयोजन बदलल्यास ती जागा मनपाच्या इतर प्रयोजनासाठी उपयोगात येऊ शकते. सदर जागेला लागून आ.क्र.४ । १२४ अन्वये विभागीय कार्यालयासाठी जागा

आरक्षित आहे. त्यामुळे टेलिकॉम सेंटरसाठी आरक्षित असेलेले ४०००.०० चौ.मी. क्षेत्र विभागीय कार्यालय या प्रयोजनासाठी आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यासाठी म. प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकती । सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तद्अनुषंगिक सर्व वैधानिक प्रकिया पूर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे, यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

## सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०२/०३/२०२१

सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ – मा.शारदा सोनवणे, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२ दि-०८/०६/२०२० अन्वये मा.शहर सुधारणा समिती यांच्या शिफारसी नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.७१६५ दि.१७/०६/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर ठराव मधील खालील प्रमाणे मजकुर दुरुस्ती करणेस मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे आवश्यक आहे. " मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) एन.सी.आय.टी.(इंडिया) आकुर्डी पुणे-१९ यांचेमार्फत सन ३१/०३/२०२१ अखेर पर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण देणेत येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे ". या मजकुरा ऐवजी " मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) एन.सी.आय.टी. (इंडिया) आकुर्डी पुणे - १९ ही संस्था मा.महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन इमारत, पहिला मजला, २५ फोर्ट, मुंबई – ०१ यांची १५ व्या वित्त आयोगांतर्गत तरतुद केलेल्या निधीतुन ग्रामीण भागातील मुली व महिलांना कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षण देणेकामी सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ मान्यता प्राप्त संस्था आहे. तरी मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) एन.सी.आय.टी. (इंडिया) यांचेमार्फत सन २०२१-२०२२ साठी ह्या आर्थिक वर्षातील दि.३१/०३/२०२२ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. तरी सदर दुरस्ती करणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा ".

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०२/०३/२०२१

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ – मा.अनुराधा गोरखे, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टीवासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरिता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान आरोग्यदृष्ट्या उत्तम राहणे तसेच त्यांचे कोरोना ह्या संसर्गजन्य रोगापासुन बचाव करणे ही महानगरपालिकेची पालक म्हणून प्राथमिक जबाबदारी असलेने

झोपडपट्टीवासियांच्या घरामध्ये त्यांच्या कुटुंबांकरिता स्वच्छता किट पुरविणे गरजेचे आहे. प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना सदर स्वच्छता किट मध्ये ४ सॅनिटायझर हॅन्डी बाटल्या (सुंगंधित), १ लाईझॉल (फरशी पुसणेसाठी) (सुगंधित), २ हॅन्डवॉश, २ नॅपकिन, १० कापडी मास्क पुरविण्यात येतील त्यामुळे तेथील रहिवाशांचा बचाव होईल. सदरचे काम करणेसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई - ४०० ००१ या संस्थेस थेट पद्धतीने देण्यात यावे. सदरची खरेदी महानगरपालिकेच्या शहर सुधारणा विभागामार्फतच करण्यात यावी. तसेच शहर सुधारणा विभागांतर्गत येणा-या नागरवस्ती विकास योजना विभाग मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखाशिर्षावरील इतर योजना / कार्यक्रम अनु.क्र.१२ पान क्र.३०९ यावरुन खर्च करण्यात यावा. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी शहर सुधारणा विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर उपलब्ध करण्यात यावी. सदरचे साहित्य निधीनुसार प्राथमिक शहरातील झोपडपट्टया - १) यशवंत नगर, २) राजीव गांधी नगर-नेहरु नगर, ३) साईनाथ नगर- नेहरु नगर, ४)आंबेडकर नगर- नेहरु नगर, ५) लालटोपी नगर- मोरवाडी या झोपडपट्टयांमधील सर्व कुटुंबांना सदर साहित्याचा लाभ मिळावा व त्यानुसार इतर शहरातील झोपडपट्ट्यांना आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन मिळणेसाठी वित्तीय मान्यतेकामी मा.स्थायी समीतीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१४१/२०२१
दिनांक : १२/०३/२०२१

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.